# शकील बदायुनी - भाग १



१६ ऑगस्ट १९९६ रोजी शकील बदायुनी यांचा जन्म झाला. बालपणी ते उत्तर प्रदेशातील बदायुन येथेच रहात होते. त्यांचे वडील मौलाना होते व त्यांनी आपल्या मुलाला फारशी, उर्दू आणि अरेबिक भाषा शिकवल्या. ह्या भाषांचा अभ्यास करताना शकील यांना काव्याची - कवितेची गोडी वाटू लागली. आणि त्यामुळेच अगदी लहान वयातच हाली, गालिब आणि इक्बाल यांच्या काव्यरचना ते आनंदाने वाचू लागले. त्यानंतर ते अभ्यासासाठी अलिगढ विद्यापीठात गेले. ह्या दरम्यान राजकीय वातावरण खूपच तापू लागले होते आणि बरेचसे कवी आणि लेखक पुरोगामी विचारधारेच्या गटात सामील होत होते. परंतु शकील यांना यामध्ये रस नव्हता आणि त्यामुळे मजाज लखनवी, कैफी आझमी व मजरुह ह्या आपल्या सहकाऱ्यांबरोबर न जाता गझल आणि पारंपारिक काव्यरचना यांतच ते रमू लागले. आता त्यांनी मुशायिऱ्यांत भाग घेणे सुरू केले, जिथे त्यांना आपल्यातील काव्यप्रतिभा उत्कटतेने दाखवता येत असे. तिथे त्यांना मिळणारी दादही त्यांना आवडत असे. पुराणमतवादी असल्यामुळे त्यांनी प्रथम सामाजिक विषयांवरच काव्यलेखन आणि काव्यवाचन यांना प्राधान्य दिले. त्यानंतरच त्यांच्या काव्यलेखनातून सुधारणा होत इतर विषयही येऊ लागले. त्यानंतर त्यांनी काव्यवाचनासाठी लखनौ, हैद्राबाद असा बराच प्रवास केला. त्यामुळे लोकांमध्ये ते परिचित झाले, तसेच लोकप्रियही झाले.

पदवी परीक्षेनंतर ते दिल्ली येथे गेले आणि त्यांनी कारकून म्हणून सरकारी ऑफिसमध्ये काही वर्षे कामही केले. यासोबत त्यांचे काव्यलेखनही सुरूच होते आणि अधून मधून स्टेजवरील कार्यक्रमातही ते भाग घेत असत. त्यानंतर १९४६ साली ते मुंबईत आले. स्टेजवरील एका मुशायऱ्याच्या कार्यक्रमात दिग्गज नौशाद आणि निर्माता ए. आर. करदार यांनी त्यांच्या अनमोल शायरी ऐकल्या. खरे म्हटले

तर हा शकील यांच्या आयुष्यातील एक अतिशय भाग्याचा दिवस होत असे म्हटले तर वावगे होणार नाही. त्या दोघांनी शकीलची भेट घेतली आणि त्यानंतर ह्या कारणाने त्यांच्या वारंवार भेटीगाठी होऊ लागल्या. आतापर्यंत नौशाद यांनी गीतलेखक डी. एन्. मधोक आणि थोडंफार तन्वीर नक्वी, मजरुह, इ. सोबत बरेचसे काम केले होते. परंतु आता शकील यांनी करदार यांच्या 'दर्द' (१९४७) चित्रपटातील दहाही गाणी लिहून फारच मोठी झेप घेतली होती. ह्या चित्रपटातील 'अफसाना लिख रही हूँ' हे गाणे लिहून या नव्या गीतकाराने स्वत:ला तसेच ह्या गाण्याची गायिका उमादेवी (म्हणजेच टुनटुन) हिला प्रसिध्दीच्या शिखरावर नेऊन ठेवले. सुरैय्याने गायलेले 'हम थे तुम्हारे, तुम थे हमारे' हे गाणे सुध्दा शकील बदायुनी यांचेच आहे.

नौशाद यांचे खरोखरच आभार मानले पाहिजेत कारण निर्माता मेहबूब खान यांनी देखील त्यांच्या, लगेच पुढील वर्षी प्रदर्शित झालेल्या 'अनोखी अदा' ह्या चित्रपटात शकील ह्यांची जवळ जवळ डझनभर गाणी घेतली. 'भूलनेवाले याद ना आना' (मुकेश), 'क्यू उन्हे दिल दिया?' (शमशाद व सुरेंद्र) आणि 'भूल गये क्यू देके सहारा' (शमशाद, मुकेश) अशासारखी एकाहून एक सरस गाणी ते दीर्घकाळ देतच राहिले. पुढे निर्माता एस्. यू. सनी यांनी 'मेला' (१९४८) ह्या चित्रपटासाठी नौशाद आणि शकील यांच्याशी करार केला. शकील यांनी 'मेला' मधील सर्वच्या सर्व म्हणजे एकूण बारा गाणी सुरेख लिहून दिली. 'फिर आह दिलसे निकली' (झोहराबाई) आणि 'मै भवरा तू है फूल' (शमशाद, मुकेश) ही ह्या चित्रपटातील गाणी म्हणजे ह्या गीतकाराची उत्तुंग प्रगतीच दिसून येते. तसेच 'गाये जा गीत मीलन के' (मुकेश) हेही ह्या चित्रपटातील मस्त गाणे ! आता ह्या गीतकाराचे - शकील बदायुनी यांचे नाव घराघरात पोचले होते. रसिक श्रोत्यांना ते आपलेसे वाटू लागले.

दरम्यान शकील बदायुनी  हे एक सिध्दहस्त गीतरचनाकार आहेत हे संगीतकार गुलाम महंमद यांच्याही नजरेत चांगलेच भरले होते. त्यामुळे 'पगडी' (१९४८ - 'एक तीर चलानेवालेने' - सितारा, मुकेश) या चित्रपटाद्वारे या दोघांची भट्टी चांगलीच जमून गेली. ह्यानंतर येणाऱ्या वर्षांत 'पारस' ('दिल की लगी ने हमको दिवाना करके छोडा' - रफी - १९४९), 'शायर' ('ये दुनिया है, यहाँ दिल का लगाना' - लता व मुकेश - १९४९), 'परदेस' ('अखियाँ मिलाके जरा बात करो जी' - रफी, लता - १९५०) आणि ५० च्या दशकात एकापेक्षा एक सरस गाणी ह्या दोघांनी सहजतेने दिली.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music

that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com